शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा. क्र. विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/दिनांक ३१/०७/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/362
दि. 06TH AUG 2019.

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

### राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/ दिनांक : ३१/०७/२०१९

प्रति,

१.कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,

२.प्राचार्य,

सर्व शासकीय,अशासकीय,अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**विषयः- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :- १.शासन निर्णय क्र.स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२ दि.०२/०८/२०१७**
**२.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४ दि.०७/१०/२०१७**
**३.शासन निर्णय क्र.GAD-मातंस-२०१८/सी.आर १३८/S.१/३९/दि.१२/१०/२०१८**
**४.संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०११४/दि.३०/७/२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे त्याप्रमाणे आपल्याशी निगडीत बार्बीचा विचार करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

संदर्भ पत्र क्र.४ नुसार आपणास कळविण्यात येते की या कार्यालयाच्या अखत्यारीत येणा-या अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांनी फी ॲप्रोव्हल साठी खालील दिलेल्या तारखानिहाय फी स्ट्रक्चर बाबत सर्व कागदपत्रांची फाईल घेऊन खालील दिलेल्या ठिकाणी विहीत वेळेत हजर राहणे आवश्यक आहे. याबाबत काही दिरंगाई झाल्यास संबधीत महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

| जिल्हयाचे नाव | फी ॲप्रोव्हल साठी हजर रहावयाचा दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| कोल्हापूर | ०५/०८/२०१९ वेळ सकाळी ११.०० वाजता | ~~सायबर कॉलेज~~,कोल्हापूर विभागीय कार्यालय, |
| सांगली | ०६/०८/२०१९ वेळ सकाळी ११.०० वाजता | |
| सातारा | ०७/०८/२०१९ वेळ सकाळी ११.०० वाजता | |

विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

प्रत- १. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,पुणे-०१
२.प्राचार्य,सायबर कॉलेज,कोल्हापूर
/-उपरोक्त विषयानुसार आपण दिनांक ५/०८/२०१९ ते ७/०८/२०१९ पर्यंत आपल्या महाविद्यालयांतील कॅम्पुटर लॅब,तसेच बैठकी व्यवस्थाबाबत हॉल उपलब्ध करून देण्यात यावा.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/ 10114 दि.२९/०७/२०१९

30 JUL 2019

परिपत्रक

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र. १४६/मशि-२, दि. ०२.०८.२०१७

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७

३. शासन निर्णय क्र. GAD-मातंस-2018/C.R.138/S.1/39, दि. १२.१०.२०१८

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून **दि. १.०८.२०१९** पासून ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

MahaDBT Portal वर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे, तसेच महाविद्यालयातील लिपीक, प्राचार्य व विभागीय सहसंचालक कार्यालयांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| ०१ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| ०२ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ०३ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ०४ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ट स्तर) |
| ०५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ०६ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ०७ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ०८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ०९ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग -२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

**विद्यार्थ्यांसाठी सुचना : -**

१) उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी https://mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२) शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

३) उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

४) विद्यार्थी डी.बी.टी. पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात. तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्याने निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

५) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदविताना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तीच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

७) शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकासह किंवा विना आधार या ऑप्शन सह अर्ज करता येतो. तथापि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे. याची नोंद घ्यावी.

<u>महाविद्यालयांसाठी सुचना :-</u>

१) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेला शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी प्रथम संबंधित महाविद्यालयाच्या लिपिक लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२) शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, लाभ आदि बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपिकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी.

३) शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नांव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित / विनाअनुदानित) प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details), टक्केवारी इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.)

**महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject / Sent Back) करणे आवश्यक आहे.**

४) महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर उपलब्ध होतात.

५) **महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने (Approve / Reject / Sent Back) कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

<u>विभागीय सहसंचालक कार्यालयांबाबत सुचना :-</u>

१) प्राचार्य लॉगीनमधून Approve झालेले उपरोक्त शिष्यवृत्तीचे अर्ज पडताणीसाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण (RO Login) मध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२) **विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे लॉगीनमध्ये शिष्यवृत्तीनिहाय पडताळणीसाठी उपलब्ध अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject / Sent Back) करणे आवश्यक आहे.**

३) विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये भरलेली सर्व माहिती बरोबर असल्याची, जोडलेल्या कागदपत्रावरुन छाननी करणे आवश्यक आहे.

४) काही शिष्यवृत्तीसाठी (शासन / विद्यापीठ) यांनी निश्चित केलेल्या शुल्काच्या प्रमाणानुसार लाभ देय आहेत. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी शिष्यवृत्ती अर्ज Approve केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांस अर्जामध्ये दर्शविण्यात आलेल्या शुल्काप्रमाणे शिष्यवृत्ती लाभ देण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांचे अर्ज Approval करतेवेळी विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये शुल्काबाबतची माहिती बरोबर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

५) **शिष्यवृत्तीच्या अटी-शर्ती; पूर्ण करणारे आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज (DHE Login) वर मंजूरीसाठी पाठविण्यात यावेत.**

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालयं यांना त्यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेबाबत तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्ज करणेसाठी आवश्यक ती मदत करणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत महाविद्यालयात कॅम्प आयोजित करण्यात यावेत तसेच आधार लिंकबाबतही जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या संचालनालयास सादर करण्यात यावे.

**सोबत : सर्व योजनांची माहिती.**

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

प्रत :-
१. मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
४. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.